# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे. -४११ ००१.
(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
Website : http//:barti.maharashtra.gov.in

## महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग (नागरी सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा, न्यायिक सेवा,अभियांत्रिकी सेवा), पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण, बँक, (IBPS) रेल्वे, एल.आय.सी इतर तत्सम स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनामार्फत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने बार्टी, पुणे मार्फत सन २०२४-२५ करिता **संघ लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या (नागरी सेवा) दिल्ली व महाराष्ट्र करिता, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या राज्यसेवा (राजपत्रित), न्यायिक सेवा, अभियांत्रिकी सेवा, पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण तसेच बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी या व इतर तत्सम स्पर्धा परीक्षांच्या** पूर्व प्रशिक्षणाकरीता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पात्रता:-**

१. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.
३. उमेदवाराचे वय व शिक्षण संघ लोकसेवा आयोग (नागरी सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग-(राज्यसेवा, न्यायिक सेवा, अभियांत्रिकी सेवा) तसेच पोलीस व मिलिटरी भरती व बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी या व इतर तत्सम स्पर्धा परीक्षांच्या अटी व शर्ती नुसार असावे.
४. रु. ८ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेला उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असेल.
५. अनाथ आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराकडे महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडून निर्गमित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक.
६. उमेदवार दिव्यांग असल्यास ४०% पेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी.

**आरक्षण :-**

- ❖ महिला ३०%, दिव्यांग (PWD) ५%, अनाथ-१%, वंचित-५% (वाल्मिकी व तत्सम जाती-होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी, इ.साठी), जागा आरक्षित असतील.

**विद्यार्थी निवडीचे निकष :-**

- ❖ सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी निवड ही सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test- CET) द्वारे प्राप्त गुणांच्या आधारे केली जाईल.

**ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम दिनांक:- ०३/०७/२०२४**

**इच्छुक व पात्र उमेदवारांनी** http://trtipune.in/bartregmay24/ **लिंकवरुन ऑनलाईन नोंदणी करावी.**
उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी वरील उपलब्ध लिंक वरील मार्गदर्शक सूचना वाचून ऑनलाईन अर्ज सादर करावा.

अर्ज भरताना तांत्रिक अडचणी आल्यास helpdesk.schemebarti@gmail.com या ईमेल वर संपर्क साधावा.
संपर्क क्रमांक : ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९

सही/-
(सुनिल वारे)
**महासंचालक,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.**